# महाराष्ट्र शासन

क्रमांक : जीवका-१५१७/प्र.क्र.०६/नापु-२३,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १ मार्च, २०१७

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
३) सर्व उपायुक्त (पुरवठा)
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
५) अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे/सोलापूर/नागपूर.

विषय :- जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत “डाळी” या जीवनावश्यक वस्तूंवर लागू असलेल्या साठवणूक मर्यादेत वाढ करण्याबाबत.
संदर्भ :- राज्य शासनाची दिनांक १९.१०.२०१६ ची अधिसूचना.

महोदय /महोदया,

केंद्र शासनाच्या दिनांक २९.०९.२०१६ च्या अधिसूचनेस अनुसरुन, राज्य शासनाने दिनांक ३०.०९.२०१६ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या जीवनावश्यक वस्तूंवरील साठा निर्बंधास दिनांक ३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ दिली असून, याबाबतची अधिसूचना दिनांक १९.१०.२०१६ रोजी पुन:प्रकाशित केली आहे.

२. सद्य:स्थितीत, राज्यात डाळी विशेषत: तूरीचे जास्त प्रमाणात उत्पादन झाल्याने घाऊक बाजारात तूरडाळीच्या दरात घट झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा परिस्थितीत, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, या दृष्टीकोनातून डाळीच्या घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांसाठी सद्य:स्थितीत लागू असलेल्या साठवणूक मर्यादेत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

| | शहराची वर्गवारी | सध्याची साठा मर्यादा (क्विंटलमध्ये ) | | सुधारित साठा मर्यादा (क्विंटलमध्ये ) | |
|---|---|---|---|---|---|
| | | घाऊक | किरकोळ | घाऊक | किरकोळ |
| (i) “डाळी” | महानगरपालिका क्षेत्र | ३,५०० | २०० | १०,५०० | ६०० |
| | अ-वर्ग नगरपालिका क्षेत्र | २,५०० | १५० | ७,५०० | ४५० |
| | इतर ठिकाणी | १,५०० | १५० | ४,५०० | ४५० |

उपरोक्त सुधारणा डाळींचा खरेदीचा हंगाम संपुष्टात येईपर्यंत म्हणजेच दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत लागू राहील.

३. उपरोक्त आदेशाची आपण तात्काळ अंमलबजावणी करावी, तसेच याबाबत आपण जातीने लक्ष घालून वेळोवेळी कार्यवाही करावी.

(स.श्री.सुपे)
उप सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय
२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय
३) मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे स्वीय सहायक.
४) मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे स्वीय सहायक.
५) कार्यासन नापु-२३, संग्रहार्थ.